# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३०/०९/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कळमेश्वर** :– दिनांक २२/०३/२०१५ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. ५५/२०१७ कलम ३७६, ३६६(अ),३७६(२)(१)(एन) भादवी सहकलम ४,६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २०/०३/२०१५ चे १०.०० वा. ते १८.०० वा. सुमारास फिर्यादी यांची पीडित मुलगी वय १६ वर्ष हिला आरोपी नामे– अनिल काशीराव नाथे, वय ३७ वर्ष, रा. घोराड ता. कळमेश्वर याने पीडितेला फुस लावून पळवुन नेले व तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापीत केले.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मपोउपनि श्रीमती दंडवते, पो.स्टे. कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ३०/०९/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री आर.पी.पांडे, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३६३ भादंवि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व २,०००/–रु. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावास तसेच कलम ६ पोक्सो मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५,०००/–रू. दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी परसोडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानीप्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, प्रमोद कडबे, पोहवा मनोज तिवारी, पोना प्रकाश वर्मा यांनी मदत केली आहे.

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. काटोल** :– दिनांक ०३/०३/२०२० चे २२.२१ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. क्र. १८५/२०२० कलम ३५४(अ), ३५४(ड), ३४१ भादवी सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०३/०३/२०२० चे १९.०० वा. ते १९.३० वा. सुमारास फियादी/पीडिता वय १६ वर्ष हिचा आरोपी नामे– रोशन विजय टाले, वय २२ वर्ष, रा. गडपूरा, काटोल याने तिचा सतत पाठलाग करून दि. ०३.०३.२०२० रोजी रस्त्यात अडकवुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन मपोउपनि श्रीमती सोनाली जगताप यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक ३०/०९/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री ओ.पी.जयस्वाल, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३४५(अ) भादवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/– रू. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावास सहकलम ८ पोक्सो मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/– रू. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस सश्रम कारावास तसेच कलम ३४१ भादवी

मध्ये १ महिना सश्रम कारावास व ५००/— रू. दंड व दंड न भरल्यास ७ दिवस साधी कैद शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती रशमी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानीप्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोशि प्रमोद कोहळे, पो. नाईक प्रकाश वर्मा यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर